## डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


| महाराष्ट्र पोलीस | पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर<br>तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)<br>दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६<br>Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |
|---|---|---|


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ८७ /२०२५ दि. १२ /०५/२०२५

**–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–**

**ज्याअर्थी,** डोबिंवली वाहतुक उप विभागाच्या हद्दीत डोबिंवली पुर्व चोळेगाव मधिल गावदेवी मंदीर येथे दिनांक १३/०५/२०२५ ते १५/०५/२०२५ पावेतो चोळेगाव त्रैवार्षिक यात्रा उत्सव असुन दिनांक १३/०५/२०२५ रोजी पालखी सोहळा असल्याने ०३ दिवस चोळेगाव रोड येथील जुने हनुमान मंदीर ते एस बी आय बॅक ठाकुली पुर्व शाखा पर्यंत रस्ता बंद करून वाहतुक पर्यायी मार्गाने वळविणे आवश्यक आहे. सदर रस्ता अरूंद असल्याने वाहतुक सुरू ठेवणे शक्य नाही. त्यामुळे सदर रस्त्यावरील वाहतुक दिनांक १३/०५/२०२५ रोजी दुपारी १२:०० ते १६/०५/२०२५ रोजी पहाटे ०६:०० वाजेपावेतो ०४ दिवस रस्ता पुर्णपणे बंद करून पर्यायी मार्गाने वाहतुक वळवावी लागणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | १) जोशी हायस्कुल ठाकुर्ली ब्रिज कडुन बापु दातार रोड व नेहरू रोड मार्गे ठाकुर्ली पुर्व स्टेशनकडे जाणाऱ्या वाहनांना **बापु दातार रोड कट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदर वाहने सदरची वाहने व्ही पी रोड मंजुनाथ शाळा कट मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | २) छेडा रोड पंचायत बावडी रोड कडुन ठाकुर्ली पुर्व स्टेशनकडे जाणाऱ्या वाहनांना **छेडा चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदर वाहने सदरची वाहने व्ही पी रोड मंजुनाथ शाळा कट मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | ३) ठाकुर्ली पुर्व स्टेशनकडुन जुने हनुमान मंदीर मार्गे चोळेगाव रोड बंदीश पॅलेस कडे जाणाऱ्या वाहनांना **जुने हनुमान मंदीर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने सरळ म्हसोबा चौक, ९० फीट रोड मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | ४) ९० फीट रोड वरून म्हसोबा चौक मार्गे जुने हनुमान मंदीर कडुन ठाकुर्ली स्टेशन कडे जाणाऱ्या वाहनांना **म्हसोबा चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने ९० फीट रोडने खंबाळपाडा गाव ९० फीट कॉर्नर मार्ग कल्याण रोडने इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | ५) बंदीश पॅलेस रोड कडुन चोळेगाव जुने हनुमान मंदीर कडे जाणाऱ्या वाहनांना **एस.बी. आय. बॅक ठाकुर्ली पुर्व शाखा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने एस बी आय बॅक ठाकुर्ली पुर्व शाखा समोरील शिव विठ्ठल गॅलेक्सी रोड अथवा शिवमंदीर तलाव रोड ने ९० फीट रोडमार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | ६) जोशी हायस्कुल ठाकुर्ली ब्रिज कडुन बापु दातार रोड व नेहरू रोड मार्गे ठाकुर्ली पुर्व स्टेशनकडे **अवजड** वाहनांना **बापु दातार रोड कट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने व्ही पी रोड मंजुनाथ शाळा कट मार्गे इच्छित स्थळी जातील. |

सदर वाहतूक अधिसूचना **प्रवेश बंद अ.क्र.१ व २ यांस दि. १३/०५/२०२५ रोजी दुपारी १२:०० ते रात्रौ २३:५५ वाजेपावेतो** तसेच **प्रवेश बंद अ.क्र.३ व ६ यांस दि. १३/०५/२०२५ रोजी दुपारी १२:०० ते दिनांक १६/०५/२०२५ रोजी सकाळी ०६:०० वाजेपावेतो** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

CS CamScanner

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

**प्रत कार्यवाहीस्तव,**

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.

प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.

पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालीका, कल्याण

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, कल्याण

नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

२/– सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत कार्यवाहीस्तव सविनय सादर,**

मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि डोंबिवली, कोळशेवाडी, कल्याण वाहतूक उपविभाग.

CamScanner